मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दिनांक ३० जानेवारी २०२४ । पान १

# मोशी टोलनाका ते शिवाजी चौकपर्यंत सर्व्हिस रस्त्याची मागणी

## विद्यार्थी अन् नागरिकांचा जीव मुठीत घेऊन प्रवास

**मनीषा थोरात-पिसाळ**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुणे - नाशिक महामार्गावरील मोशी टोलनाका ते शिवाजी चौकापर्यंत सर्व्हिस रोड करण्यात यावा. सर्व्हिस रस्ता झाल्यानंतर विद्यार्थी आणि महामार्गालगतच्या वस्तीमधील नागरिकांना दिलासा मिळेल. सद्या महामार्गालगत मोठ्या दोन आणि छोट्या तीन शाळा आहेत. विद्यार्थी, पालक, नागरिक रस्ता ओलंडताना जीव मुठीत घेऊन ये-जा करतात. सर्व्हिस रस्ता झाल्यास, वाहतूक कोंडीमुळे होणारे प्रदूषण, किरकोळ अपघात वाचण्यास मदत होईल. त्यामुळे या परिसरात सर्व्हिस रस्ता करावा अशी मागणी करण्यात येत आहे. गेल्या आठ-दहा वर्षांमध्ये



परिसरातील नागरिकरण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे मुख्य रस्त्यावरुन मोशी, चऱ्होली आणि चिखली, भोसरी भागात जाणाऱ्या वाहनचालकांचे प्रमाण मोठे आहे. या परिसरात सर्व्हिस रस्ता करावा अशी मागणी करण्यात येत आहे. गेल्या आठ-दहा वर्षांमध्ये परिसरातील नागरिकरण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पुणे-नाशिक असा प्रवास करणाऱ्या वाहनांच्या मोठ्या रांगा वर्दळीच्या वेळी लागल्यामुळे स्थानिक रहिवाशांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. महामार्गालगत दोन्ही बाजूंनी मोठी वस्ती आहे. त्या नागरिकांना ये-जा करण्यासाठी सर्व्हिस रस्ता आवश्यक आहे. सर्विसरोड नसल्यामुळे किरकोळ अपघाताच्या घटनाही घडलेल्या आहेत. वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात असल्यामुळे प्रदूषण ही मोठ्या प्रमाणात होते आहे. त्यामुळे सर्व्हिस रस्त्याचे काम मार्गी लावावे, अशी मागणी होत आहे.

> “ शहरातील वाढते नागरीकरण आणि वाहनांची संख्या पाहता मोशी टोल ते शिवाजी चौकापर्यंत सेवा रस्ता विकसित करण्याची आवश्यकत आहे. वाहतूक कोंडी आणि प्रदूषण यामुळे स्थानिक नागरिक हैराण झाले असून, याबाबत तात्काळ कार्यवाही करावी, अशी आमची मागणी आहे.
>
> **-गणेश सस्ते,** सामाजिक कार्यकर्ते



> “ पांजरपोळ चौकामध्ये सर्व्हिस रोड दिला आहे. मात्र वाहनचालक विरूध्द दिशेने मोठ्या प्रमाणात वापर करतात. हे धोकादायक असून नियमांचे उल्लघंन करणारे आहे. विद्यार्थी आणि नागरिकांच्या दृष्टींने मोशी-टोलनाका ते शिवाजी चौकापर्यंत सर्व्हिस रस्ता विकसित करण्याआधी ओव्हरब्रिज आणि रस्त्याचे रुंदीकरण होणे आवश्यक आहे. महामार्गालगतच्या वस्तीमधील नागरिक आणि विद्यार्थ्यांना ये-जा करण्यासाठी सेवा रस्ता आवश्यक आहे.
>
> **-दीपक साळुंखे,** वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक



# काळाखडक एसआरएच्या विरोधात रहिवाशांची निदर्शने

## पुनर्वसन प्रकल्प राबविण्यासाठी रहिवाशांच्या चुकीच्या पध्दतीने सहमती घेण्याचे काम करताहेत

**वाकड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

येथील काळाखडक झोपडपट्टीतील रहिवाशांना विश्वासात न घेता विकसक एसआरए पुनर्वसन प्रकल्प राबवित असल्याचा आरोप करत रहिवाशांनी वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष अनिल जाधव यांच्या नेतृत्वाखाली काळाखडक चौकात सोमवारी (ता. २९) सकाळी निदर्शन आंदोलन केले. झोपडपट्टीत एसआरए पुनर्वसन प्रकल्प राबविण्यासाठी रहिवाशांच्या चुकीच्या पध्दतीने सहमती




घेण्याचे काम करत आहेत. काही दलाल व गुंडांना हाताशी धरून मनमानी पद्धतीने व दडपशाहीने काहीजण येथे रहिवाशांना अर्ज भरण्यास भाग पाडले जात आहे असा आरोप करत रहिवाशांनी घोषणाबाजी केली. पिंपरी-चिंचवड महापालिका आणि एसआरए विभागाने तात्काळ दखल घेऊन या बेकायदेशीर बिल्डरांच्या विरोधात योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा काळाखडक संघर्ष समितीच्या वतीने लवकरच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयावर व महापालिका भावनावर भव्य मोर्चा काढण्याचा इशारा अनिल जाधव यांनी दिला. यावेळी काळाखडक परिसरातील विविध पक्ष संघटनांचे कार्यकर्ते, रहिवाशी उपस्थित होते.

> “ झोपडपट्टीत दलित, आदिवासी व वडारी समाजाची गरीब गरजू लोक वर्षानुवर्षे राहत आहे. त्यांनी खूप कबाडकष्ट करुन मेहनतीने आपला निवारा उभा केला आहे. त्यामुळे या उपेक्षित समाजाला विश्वासात न घेता गुंडाच्या व दडपशाहीच्या जोरावर एसआरए अथवा कोणतीही योजना राबवू नये अन्यथा अन्यायाविरोधात मोठा संघर्ष उभा केला जाईल.
>
> **- अनिल जाधव,** प्रदेशउपाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी

> “ मे.जय इंटरप्रयाझेस हे जमीन मालक असून काळाखडकचे पुनर्वसन करण्यासाठी त्यांचा एकमेव प्रस्ताव आमच्याकडे दाखल झाला आहे. त्यांच्या व्यतिरिक्त अन्य एक-दोन विकसक प्रयत्न करत असल्याचे आमच्या कानावर आहे. मात्र, नियमानुसार जागामालकाला प्रथम प्राधान्य दिले जाते.
>
> **- निलेश गटणे,** सीईओ (आयुक्त) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

# भोसरी'त सर्वाधिक १,३६,२६६ मतदार वाढ

## तब्बल दोन लाख ७७ हजार ८१४ मतदार अधिक झाले

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने एक जानेवारी २०२४ या अर्हता तारखेपर्यंत वयाची अठरा वर्ष पूर्ण केलेल्या मतदारांची नोंदणी केली. जिल्हाधिकाऱ्यांनी ती यादी नुकतीच प्रसिद्ध केली. त्यानुसार २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपेक्षा आता तब्बल दोन लाख ७७ हजार ८१४ मतदार अधिक झाले आहेत. सर्वाधिक एक लाख ३६ हजार २६६ मतदारवाढ भोसरी विधानसभा मतदारसंघात झाली आहे. शहरात चिंचवड, पिंपरी व भोसरी असे तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. चिंचवड व पिंपरीची समावेश मावळ लोकसभा आणि भोसरीचा समावेश शिरूर लोकसभा मतदारसंघात होतो. मात्र, शहराचा भाग असलेल्या ताथवडे गावाचा समावेश भोर-वेल्हे विधानसभा आणि बारामती लोकसभा मतदारसंघात होतो. विद्यमान लोकसभेची मुदत मे २०२४ मध्ये संपत आहे. त्यामुळे एप्रिल-मे महिन्यात लोकसभा निवडणूक होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोगाने मतदार नोंदणी व विशेष संक्षिप्त मतदार पुनर्निरीक्षण कार्यक्रम गेल्या वर्षी राबविला. त्यानुसार एक जानेवारी २०२४ या अर्हता तारखेवर वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या व्यक्तींची मतदार नोंदणी करण्यात आली. त्यांच्यासह पुणे जिल्ह्याची छायाचित्रासह मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार पिंपरी-चिंचवड शहरातील तीनही विधानसभा मतदारसंघात




मतदारसंख्या वाढली असल्याचे दिसते. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण कार्यक्रम राबविला. त्याअंतर्गत महिला व युवक मतदार नोंदणीसाठी विशेष शिबिरे घेण्यात आली. दुर्लक्षित घटकांसाठी सुट्टीच्या दिवशी शिबिरे घेतली. महाविद्यालये, सामाजिक संस्थांचा सहभाग वाढविला. गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदार नोंदणीची सुविधा उपलब्ध करून दिली होती. यासह मतदार नोंदणीसाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले. लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविणे, लोकसंख्यानुसार विशिष्ट वयोगटातील मतदार नोंदणी करून घेणे, नावे वगळणे, समाजातील भटक्या व विमुक्त जाती, महिला, तृतीयपंथी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नोंदणीवर भर देण्यात आला. तसेच मतदार यादी शुद्धीकरणाच्या हेतूने निधन झालेले मतदार, दुबार नावे, छायाचित्र अपडेट आणि स्थलांतरित अर्थात पत्त्यात बदल झालेल्या मतदारांची पडताळणी करण्यात आली. नावांमध्ये दुरुस्तीही करण्यात आली.चिंचवड, पिंपरी व भोसरी विधानसभा मतदारसंघ मिळून शहरातील मतदारसंख्या १४ लाख ९५ हजार ८८० झाली आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी ही मतदारसंख्या १२ लाख१८ हजार ६६ होती. म्हणजेच गेल्या पाच वर्षांत दोन लाख ७७ हजार ८१४ मतदार वाढले आहेत. यामध्ये ताथवडेतील मतदारांचा समावेश नाही. कारण, ताथवडेचा समावेश भोर-वेल्हे विधानसभा आणि बारामती लोकसभा मतदारसंघात होतो. जानेवारी २०२३ मध्ये तिथे नऊ हजार ५७५ मतदार होते.

### मतदारवाढीची कारणे

- » चिंचवड व भोसरी विधानसभा मतदारसंघात नव्याने समाविष्ट गावांचा सहभाग
- » चिंचवडमध्ये वाकड, पुनावळे, रावेत, किवळे, मामुर्डी या गावांचा समावेश
- » भोसरीमध्ये चऱ्होली, डुडुळगाव, मोशी, चिखली, तळवडे या गावांचा समावेश
- » समाविष्ट गावांत नवीन बांधकामे, गृहनिर्माण सोसायट्यांची संख्या वाढली
- » समाविष्ट गावांत निवासी क्षेत्र वाढल्यामुळे मतदारसंख्येतही वाढ

# पिंपळे सौदागर ते पिंपरीला जोडणाऱ्या पुलाचे काम पूर्ण करा

## नाना काटे यांच्या अधिकारी व ठेकेदारांना सूचना

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** प्रभाग क्र २८ रहाटणी – पिंपळे सौदागर ते पिंपरीला जोडणाऱ्या जुन्या पुला लगत नविन समांतर पुल बांधण्यात येत आहे. या सुरू असलेल्या कामाची आज माजी विरोधी पक्षनेते, नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी संबंधीत महापालिका अधिकारी व ठेकेदार यांच्या समवेत पाहणी केली. या पाहणी दरम्यान संबंधितांना



सुचना केल्या की, या पुलाचे काम करत असताना पिंपरीच्या बाजुने शेवटच्या स्लॅब चे काम गेली अनेक दिवस काम संथ गतीने सुरू आहे ते काम लवकरात लवकर पुर्ण करावे. तसेच या पुलावरून ये – जा करणाऱ्या वाहनाची वर्दळ जास्त असुन नागरिकांना वाहतुकीच्या खोळंबण्याच्या त्रासाचा सामना करावा लागत आहे. त्याबाबत देखील योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्या. तसेच या पुलाचे काम करताना पिंपरीकडुन पिंपळे सौदागरकडे येताना रस्त्याच्या दोन्ही बाजुकडील रस्त्याच्या उताराचे काम व्यवस्थीत करून हे काम करत असताना खोदण्यात येणाऱ्या दत्त मंदीर ते महादेव मंदीर पर्यत या रस्त्याच्या दोन्ही बाजुने व्यवस्थीत डांबरीकरण करण्यात याव्या. अशा सुचना देखील संबंधित अधिकारी व ठेकेदार याना करण्यात आल्या. या पाहणीवेळी प्रकल्प कार्यकारी अभियंता बाप्पु गायकवाड, उपअभियंता अभिमान भोसले, ठेकेदार व्ही एम मातेरे कंपनीचे प्रोजक्ट मॅनेजर राजेश तनवे, इंजिनियर, व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# भाजपा ग्रामपंचायतही जिंकू शकत नाही

## ईव्हीएम नसेल तर भाजप ग्रामपंचायत जिंकू शकत नाही

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
भारतीय जनता पक्षाला निवडणुकांमध्ये मिळालेले यश हे त्यांच्या पक्षाचे नाही, तर त्यांनी ईव्हीएम मशीनमध्ये केलेल्या घोटाळ्याचे यश आहे.परंतु मध्य प्रदेशमध्ये झालेल्या निवडणुकीच्या निकालानंतर माजी खात्री पटली आहे की ईव्हीएममध्ये भारतीय जनता पक्षाने निश्चितच घोटाळा केला आहे आणि त्यामुळेच त्यांना यश मिळाले आहे. जर ईव्हीएम नसेल तर भाजप देशामधील एकही ग्रामपंचायत निवडणूक जिंकू शकत नाही असा विश्वास शिवसेना नेते आणि खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केला.जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे आयोजित करण्यात आलेल्या युवा संसदेमध्ये संजय राऊत यांची मुलाखत शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी घेतली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष व युवा संसदेचे अध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर उपस्थित होते.संजय राऊत म्हणाले की, राजकारण करायचे असेल तर मनामध्ये भीती बाळगून चालत नाही. भीती खुंटीला टांगल्याशिवाय राजकारणामध्ये यशस्वी होता येत नाही. राजकारणामध्ये विरोधकांचाही सन्मान केला पाहिजे. ही शिकवण बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हाला दिली. परंतु सध्या मात्र विरोधकांना संपवण्याचे कटकारस्थान महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात सुरू आहे. या संघर्षामध्ये शिवसेना कायम लढत राहणार आहे. माझ्यावर शिवसेना संपवण्याचे आरोप केले जातात. परंतु जे आरोप करतात तेच लोक शिवसेना सोडून जातात आणि आम्ही मात्र शिवसेना वाचवण्याचे काम गेल्या ४० वर्षांपासून करत आहोत आणि यापुढेही करत राहणार. देशाच्या संसदेमध्ये मी मागील २२ वर्षांपासून खासदार म्हणून काम करत आहे. परंतु गेल्या दहा वर्षांमध्ये संसद लोकशाहीचे मंदिर राहिलेले नाही. तर त्या ठिकाणी केवळ आरडाओरडा करून एकमेकांचे गळे दाबण्याचे आणि लोकशाही संपवण्याचे काम सुरू आहे. देशामध्ये बेरोजगारी वाढत आहे. भ्रष्टाचार वाढत आहे, परंतु या संबंधात बोलणाऱ्यांना तुरुंगामध्ये टाकले जात असल्याचे सांगत संजय राऊत यांनी भाजप नेत्यांवर टीका केली.महाराष्ट्र खड्ड्यात घालणारेच आज सत्तेमध्ये बसले आहे. अशा लोकांवर थुंकायचे नाही तर काय फुले उधळायची का? एकेकाळी महाराष्ट्र दिल्लीमध्ये ताठ मान करून वावरत होता, परंतु आज मात्र या भ्रष्टाचारी आणि बेईमान लोकांमुळे महाराष्ट्राची मान संपूर्ण देशामध्ये शरमेने खाली गेली आहे. त्यांच्या विरोधातील लढा शिवसेना कायम सुरू ठेवणार आहे, अशी भूमिका संजय राऊत यांनी मांडली.अयोध्येमध्ये श्रीराम मंदिर हे भाजपने उभारलेले नाही, तर सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर मंदिर समितीने हे मंदिर उभारले आहे. परंतु पंतप्रधान मोदी मात्र उपवासाचे नाटक करून देशाची दिशाभूल करत आहेत. देशातील लोकांच्या अंगावर वस्त्र नाही म्हणून महात्मा गांधी तसेच आयुष्यभर वावरले, त्याप्रमाणे नरेंद्र मोदी हे दररोज चटईवर झोपणार आहेत काय ? असा सवाल करतानाच ही नौटंकी त्यांनी बंद करावी आणि जनतेच्या मूळ प्रश्नांकडे लक्ष द्यावे, अशा शब्दात संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टोला लगावला.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे आयोजित करण्यात आलेल्या युवा संसदेमध्ये संजय राऊत यांची मुलाखत शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी घेतली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष व युवा संसदेचे अध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर उपस्थित होते.



### लोकशाही संपवण्याचे काम सुरू

» संजय राऊत म्हणाले की, राजकारण करायचे असेल तर मनामध्ये भीती बाळगून चालत नाही. भीती खुंटीला टांगल्याशिवाय राजकारणामध्ये यशस्वी होता येत नाही. राजकारणामध्ये विरोधकांचाही सन्मान केला पाहिजे. ही शिकवण बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हाला दिली. विरोधकांना संपवण्याचे कटकारस्थान महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात सुरू आहे. या संघर्षामध्ये शिवसेना कायम लढत राहणार आहे. माझ्यावर शिवसेना संपवण्याचे आरोप केले जातात. परंतु जे आरोप करतात तेच लोक शिवसेना सोडून जातात आणि आम्ही मात्र शिवसेना वाचवण्याचे काम गेल्या ४० वर्षांपासून करत आहोत आणि यापुढेही करत राहणार. देशाच्या संसदेमध्ये मी मागील २२ वर्षांपासून खासदार म्हणून काम करत आहे. परंतु गेल्या दहा वर्षांमध्ये संसद लोकशाहीचे मंदिर राहिलेले नाही. तर त्या ठिकाणी केवळ आरडाओरडा करून एकमेकांचे गळे दाबण्याचे आणि लोकशाही संपवण्याचे काम सुरू आहे.

# अमेरिकेत मराठी मुलांना बालभारतीकडून पाठ्यपुस्तके

## २० टक्क्यांपर्यंत बदल करून देण्याचे अधिकार बालभारतीला

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
उत्तर अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळामार्फत मराठी भाषा शिकणाऱ्या पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी बालभारतीतर्फे पाठ्यपुस्तके पुरवली जाणार आहेत. बृहन्महाराष्ट्र मंडळाला स्थानिक गरजेनुसार आवश्यक असल्यास पाठ्यपुस्तकांमध्ये २० टक्क्यांपर्यंत बदल करून देण्याचे अधिकार बालभारतीला देण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार शिक्षक प्रशिक्षणाची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेवर सोपवण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागाने या बाबतचा निर्णय घेतला. उत्तर अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळ तेथील पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी शिकवणे, परीक्षा घेणे, प्रमाणपत्र देण्याचे काम गेल्या नऊ वर्षांपासून करत आहे. त्यामुळे मराठी भाषेची अभिवृद्धी करण्यासाठी या बृहन्महाराष्ट्र मंडळ यांच्याशी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या सामंजस्य



कराराची अंमलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण विभागांतर्गत विविध कार्यालयांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार उत्तर अमेरिकेतील शाळेतील पाचवीच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांची राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळा मार्फत चालवल्या जात असलेल्या शाळेमधील विद्यार्थ्यांमध्ये प्रसार करणे, त्यांना अभ्यासक्रम, पुस्तक उपलब्ध करून देणे, परीक्षा घेणे, प्रमाणपत्र देणे इत्यादी कामकाजाचा नियमित आढावा घेणे, सनियंत्रण करणे व त्यानुसार आवश्यक नियोजन करणे, योग्य निर्णय घेण्यासाठी समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. दर महिन्याला समितीची ऑनलाइन बैठक घेऊन कामकाजाचा आढावा घेण्यात येईल. उपक्रमाची उद्दिष्टे साधण्यासाठी गरजेनुसार चर्चासत्र घेतले जाईल. उपक्रमात बदलाची आवश्यकता असल्यास त्याबाबतचे अधिकार शासनाच्या मान्यतेने समन्वय समितीकडून केले जातील. उपक्रमाबाबत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद संचालक हे समन्वय साधणार आहेत.राजू शेट्टी यांनी व्यक्त केले. उत्तर अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळामार्फत मराठी भाषा शिकणाऱ्या पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी बालभारतीतर्फे पाठ्यपुस्तके पुरवली जाणार आहेत.

# प्रशासकीय इमारतींवर सौर पॅनल गरजेचे

## यापुढील काळात प्रस्तावात सौर पॅनलचाही समावेश करा : पवार



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** बारामती शहर व तालुक्यात प्रशासकीय इमारतींचे प्रस्ताव तयार करताना यापुढील काळात प्रस्तावात सौर पॅनलचाही समावेश करा, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिकार्यांना दिल्या. उपमुख्यमंत्री पवार यांनी रविवारी (दि. २८) बारामती परिसरातील विकासकामांची पाहणी केली. या वेळी त्यांनी हे निर्देश दिले.

या वेळी अपर पोलिस अधीक्षक आनंद भोईटे, उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बप्पा बहीर आदी उपस्थित होते.

तांदुळवाडी येथील रेल्वे अंडरपासचे काम करताना अपघात होणार नाही अशाप्रकारे वाहतुकीचे नियोजन करा. पावसाळ्यात पुलाखाली पाणी साचणार नाही, याबाबत दक्षता घ्या. पुलालगत सेवा रस्त्याची कामे लवकरात लवकर पूर्ण करा, असेही पवार म्हणाले.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठांतर्गत ग्रंथालयाच्या इमारतीचे काम करताना ग्रंथालयात पुरेसा सूर्यप्रकाश, हवा खेळती राहील, याची काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांना अधिकाधिक सुविधा मिळतील, यादृष्टीने नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कामे करावीत, असे निर्देश त्यांनी दिले. बेघर नागरिकांना हक्काची पक्की घरे उपलब्ध करून देण्याबाबत नगरपरिषदेने विचार करावा. सार्वजनिक विकासकामे करताना गाळेधारकांना तात्पुरत्या स्वरूपात पुनर्वसनाची व्यवस्था करा, अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्याकरिता शादीखाना परिसरात उर्दू शाळा उभारण्याबाबत प्रस्ताव सादर करा, अशा सूचना त्यांनी दिल्या. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अनिल ढेपे, महावितरणचे कार्यकारी अभियंता सुनील पावडे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार गणेश शिंदे, गटविकास अधिकारी अनिल बागल, मुख्याधिकारी महेश रोकडे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संचालक विश्वास गायकवाड, बसस्थानक आगारप्रमुख वृषाली तांबे, राष्ट्रवादीचे तालुकाध्?क्ष संभाजी होळकर, शहराध्यक्ष जय पाटील, बारामती सहकारी बँकेचे अध्यक्ष सचिन सातव, माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब जाधव आदी या वेळी उपस्थित होते.बर्हाणपूर येथील पोलिस उपमुख्यालय, बारामतीचे सुसज्ज बसस्थानक आणि पोलिसांच्या गृहनिर्माण वसाहतीचे उद्घाटन पुढील महिनाभरात केले जाणार असल्याचे सूतोवाच अजित पवार यांनी केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वीच ही उद्घाटने होणार आहेत. त्यामुळे प्रशासन तयारीला लागले आहे.बारामती शहर व तालुक्यात प्रशासकीय इमारतींचे प्रस्ताव तयार करताना यापुढील काळात प्रस्तावात सौर पॅनलचाही समावेश करा, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिकार्यांना दिल्या. उपमुख्यमंत्री पवार यांनी रविवारी (दि. २८) बारामती परिसरातील विकासकामांची पाहणी केली.

### तंत्रज्ञानाचा वापर करून कामे करा

» या वेळी अपर पोलिस अधीक्षक आनंद भोईटे, उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बप्पा बहीर आदी उपस्थित होते. तांदुळवाडी येथील रेल्वे अंडरपासचे काम करताना अपघात होणार नाही अशाप्रकारे वाहतुकीचे नियोजन करा. पावसाळ्यात पुलाखाली पाणी साचणार नाही, याबाबत दक्षता घ्या. पुलालगत सेवा रस्त्याची कामे लवकरात लवकर पूर्ण करा, असेही पवार म्हणाले.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठांतर्गत ग्रंथालयाच्या इमारतीचे काम करताना ग्रंथालयात पुरेसा सूर्यप्रकाश, हवा खेळती राहील, याची काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांना अधिकाधिक सुविधा मिळतील, यादृष्टीने नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कामे करावीत.

# मुख्यमंत्री अध्यक्ष : 'पीएमआरडीए'चे स्थापनेपासून लेखापरीक्षणच नाही

## पीएमआरडीएने आतापर्यंत लेखापरीणच केले नसल्याची धक्कादायक बाब

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मुख्यमंत्री अध्यक्ष असलेल्या पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (पुणे मेट्रोपोलिटन रिजन डेव्हलपमेंट ॲथॉरिटी – पीएमआरडीए) स्थापना ३१ मार्च २०१५ रोजी झाली. पीएमआरडीए हे शासनाकडून कोणतेही अनुदान न घेता महानगर क्षेत्रातील बांधकाम परवानगी आणि जमिनींसंबंधी मिळणारा महसूल या दोन प्रमुख उत्पन्नाच्या स्वोतावर प्राधिकरण क्षेत्राचा पायाभूत विकास करण्याचे काम करीत आहे. पीएमआरडीएने आतापर्यंत लेखापरीणच केले नसल्याची धक्कादायक बाब माहिती अधिकारातून समोर आली आहे. कायद्याने दरवर्षी लेखापरीक्षण करणे अपेक्षित आहे. काही शासकीय संस्था दोन वर्षांनी करतात. लेखापरीक्षण केल्यानंतर त्यातून आलेले आक्षेप दुरूस्त करता येतात. मात्र, लेखापरीक्षण न केल्यास आक्षेप दूर करताच येणार




नाहीत. माहिती अधिकारात पीएमआरडीएची स्थापना झाल्यापासून विकसनापोटी किती निधी प्राप्त झाला?, प्रशासनाच्या वेतनावर किती खर्च झाला?, फर्निचरसह आणि कंत्राटी पद्धतीने काम करणार्या कर्मचार्यांवर किती पैसे खर्च झाले?, याबाबतची माहिती मागतली होती. लेखापरीक्षण करणार्या विभागातून एकत्रित माहिती नसल्याचे कळविण्यात आले. अहवाल उपलब्ध असून त्यातून माहिती घेऊ शकता, असेही कळविण्यात आले. पीएमआरडीएची स्थापना झाल्यापासून आजपर्यंत लेखापरीक्षण झालेले नाही. ही गंभीर बाब आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यामध्ये लक्ष घालून लेखापरीक्षण का झाले नाही? याची चौकशी करावी आणि त्याचा अहवाल जनतेसमोर प्रसिद्ध करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.याबाबत बोलताना नागरी हक्क संस्थेचे अध्यक्ष सुधीर (काका) कुलकर्णी म्हणाले, 'पीएमआरडीए या संस्थेची स्थापना सन २०१५ मध्ये झाली. त्यानंतर एमआरडीए कायद्यानुसार त्याला दर्जा प्राप्त झाला. पीएमआरडीए स्थापन होऊन आठ वर्षे झाली. मी माहिती अधिकार कायद्याच्या अंतर्गत पीएमआरडीएकडे त्यांच्या लेखापरीक्षणाचा अहवाल १३ डिसेंबर २०२३ रोजी मागितला होता. मला ३ जानेवारी २०२४ रोजी पत्र देऊन आमचे लेखापरीक्षण झाले नाही.